www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




अधिक माहिती - पान ३

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक ११० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय कक्षाच्या मदतीचा चढता आलेख

● मुंबई, विशाल पाटील :



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील विशेष वैद्यकीय कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या आयुष्यात निरामय आरोग्याचा प्रकाश आणला आहे. गोरगरीब – गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. यानुसार कक्षाने सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत अवघ्या 8 महिन्यात एकूण 12 कोटी 73 लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. माहे, जानेवारी, 2024 पासून ते माहे, ऑगस्ट 2024 पर्यंत कक्षाच्या माध्यमातून 323 रुग्णांना मदत झाली आहे. हृदय रोग, कर्करोग, यकृत प्रत्यारोपण, मूत्रपिंड प्रत्यारोपण, बोनमॅरो ट्रान्सप्लांट, फुफ्फुसाचे आजार, अस्थिरोग अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रीया (Replacement Surgeries), यासारख्या गंभीर व सर्व सामन्यांच्या आवाक्याबाहेर असलेल्या आजारांच्या शस्त्रक्रियेंचा समावेश आहे. गोर-गरीब रुग्णांनी धर्मादाय योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री मदत कक्षाच्यावतीने करण्यात आले आहे. निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांवर मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी योजना तयार केली आहे. पान २ वर

विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी

## जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात सरकारची घोषणा




● नागपूर, नितीन देवळेकर :

विद्यार्थ्यांपासून ते खासदारांपर्यंत सर्वांनाच जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता किती असते हे अनेक प्रकरणांवरून समोर आले आहे. जात प्रमाणपत्र काढल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येतो. या प्रमाणपत्रासाठी वेगवेगळ्या प्रवर्गानुसार वेगवेगळे नियम आहेत. सध्या विविध व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असते. राज्य सरकारने जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात मोठी घोषणा केली असून त्याचे पालन न केल्यास प्रवेश रद्द होईल अशी तंबी दिली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत. याबाबत विद्यार्थी, पालक, सामाजिक संघटना यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गाप्रमाणेच इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गातील उमेदवारांकरिता मुदत देण्यात आली आहे, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

सन २०२४-२५ या वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांना सद्य:स्थितीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून हा कालावधी सहा महिन्यांचा राहणार आहे. सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील.

### जात वैधता प्रमाणपत्र कशासाठी लागते?

“ मागास प्रवर्गातील व्यक्तीला शिक्षण, राजकारण, नोकरी किंवा इतर कशातही आरक्षणाचा लाभ घ्यायचा असेल तर जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते. आरक्षित जागांवर शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतला किंवा नोकरी मिळवली तर जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बांधकारक असते. यासोबतच सरकारी नोकरदारांना आरक्षणानुसार बढती मिळवायची असेल तर त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक असते. स्थानिक स्वराज्य संस्थेपासून तर लोकसभेपर्यंत प्रत्येक निवडणुकीत आरक्षित जागांवर ज्या उमेदवारांना निवडणूक लढवायची असेल त्यांना निवडणूक अधिकाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते.

## थोडक्यात



### राष्ट्रवादीच्या जेष्ठ मंत्र्याच्या घरातच फूट, मुलगी लवकरच शरद पवार गटात सोबत जावयानेही....

● गडचिरोली, सचिन कदम :

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व जेष्ठ मंत्र्याच्या घरात फूट पडली असून लवकरच त्यांची मोठी मुलगी शरद पवार गटात प्रवेश करणार आहे. आज जिल्ह्यातील आलापल्ली येथे झालेल्या जनसन्मान यात्रेत मंत्री यांनी स्वतः यासंदर्भात भाष्य केले असून विरोधात गेलेल्या जावई आणि मुलीला धडा शिकवा, असे कार्यकर्त्यांना आवाहन केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. पान २ वर

### सिंगापूरच्या सरन्यायाधीशांच्या उपस्थितीत मराठा आरक्षण याचिकेची सुनावणी

● मुंबई, यश सावंत :




मराठा आरक्षणाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर शुक्रवारी (6 सप्टेंबर) न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीवेळी सिंगापूरच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सुंदरेश मेनन हेदेखील न्यायालयात हजर होते. राज्य सरकारनं शिक्षण व नोकरीमध्ये मराठा समाजाला 10 टक्के आरक्षण दिलं. त्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर एकत्रित सुनावणी सुरू आहे. मराठा आरक्षणाच्या सुनावणीला चक्क सिंगापूरच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सुंदरेश मेनन यांच्या हजेरीमुळं अनेकांना अनेक प्रश्न पडले असणार. मिळालेल्या माहितीनुसार, सिंगापूर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सुंदरेश मेनन आणि इतर दोन न्यायमूर्ती हे मुंबईत आले होते. पान २ वर

## राज्यात परिवर्तन करण्याची जनतेची मानसिकता; मविआ बहुमताने विधानसभा निवडणूक जिंकेल: रमेश चेन्नीथला




● मुंबई, विशाल कारंडे :

विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्याचे काम सुरु असून आतापर्यंत काँग्रेस पक्षाने १७२ मतदार संघाचा आढावा घेतला आहे. २५ तारखेपर्यंत सर्व २८८ मतदार संघाचा आढावा पूर्ण होईल. राज्यातील वातावरण मविआसाठी अनुकुल आहे, परिवर्तन करण्याची जनतेची मानसिकता बनलेली असून भ्रष्ट महायुती सरकारला सत्तेतून खाली खेचून २/३ बहुमताने मविआचे सरकार येईल असा, विश्वास प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे.

टिळक भवनमध्ये पत्रकार परिषदेत बोलताना चेन्नीथला पुढे म्हणाले की, राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडलेली आहे, हत्या, दरोडे, महिलांवरील अत्याचारात वाढ झालेली आहे. पुण्यात तीन दिवसात दोन हत्या करण्यात आल्या. महागाई आवाक्याबाहेर गेल्याने सण साजरे करणे अवघड झाले आहे. जनता प्रचंड त्रस्त आहे पण महायुती सरकार मात्र घोटाळे करून पैसे वसुल करण्यात व्यस्त आहे असे चेन्नीथला म्हणाले.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मराठवाडा व विदर्भात पुराने थैमान घातले असून १२ लाख एकरवरील पिकांचे नुकसान झाले आहे, १२ लोकांचा मृत्यू झाला आहे, रस्ते, पुल वाहून गेले परंतु केंद्रातील भाजपा सरकार महाराष्ट्राकडे लक्ष देत नाही. तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात पुर आल्यानंतर दोन केंद्रीय मंत्रालये तैनात करण्यात आली आहेत, कृषी मंत्री व अर्थमंत्री तातडीने मदत मिळावी यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रात मात्र अद्याप केंद्राचे पथकही आले नाही, केंद्र सरकार महाराष्ट्राला सापत्न भावाची वागणूक का देत आहे? केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला अजून मदत का मिळत नाही? महायुतीचे नेते केंद्राकडे मदत का मागत नाहीत? असे सवाल पटोले यांनी विचारले आहेत. पान २ वर

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचा विक्रम

### गेल्या २ वर्ष २ महिन्यात ३२१ कोटींहून अधिक अर्थसहाय्य वितरित ४० हजारहून अधिक गंभीर रुग्णांचे वाचले प्राण

● मुंबई, यश सावंत :




मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीने गेल्या २ वर्ष २ महिन्यात ३२१ कोटींहून अधिक अर्थसहाय्य वितरित करुन तब्बल ४० हजारांहून अधिक गंभीर रुग्णांचे प्राण वाचविण्याचा विक्रम केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरगरीब - गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये, या मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार कक्षाचे काम सुरु आहे. याचाच परिणाम म्हणून मु.वै.स.क. मंत्रालय, मुंबई कार्यालयामधून तब्बल २९२ कोटींपेक्षा अधिक तर मु.वै.स.क.,नागपूर कार्यालय मधून २८ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळवणे सोपे होण्यासाठी कक्षातर्फे विशेष पाऊले उचलण्यात येत आहेत. आता मदत मिळवण्यासाठी मुंबईत मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहीलेली नाही. सहायता कक्षाच्या 8650567567 या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट मोबाईलवर अर्ज उपलब्ध करुन दिला जात आहे. पान २ वर

## घोडबंदर मार्गावरील उड्डाणपूलावर पुन्हा अपघात, एसटी बसगाडी कठड्याला धडकली



● ठाणे, रोहित जैसवार :

घोडबंदर येथील मानपाडा येथे शुक्रवारी सकाळी राज्य परिवहन सेवेची (एसटी) बसगाडी उड्डाणपूलाच्या सुरूवातीला असलेल्या कठड्याला धडकली. सुदैवाने अपघात झाला तेव्हा बसगाडीमध्ये प्रवासी नव्हते. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. या अपघातामुळे घोडबंदर मार्गावर काहीकाळ वाहतुक कोंडी झाली होती. तर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिक हैराण झाले आहेत.

गेल्याकाही दिवसांपासून घोडबंदर मार्गावर मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. अपघात, रस्त्यांची कामे तसेच अपुऱ्या वाहतुक उपाययोजना यामुळे नागरिकांना प्रचंड मन:स्तापाला सामोरे जावे लागत आहे. पान २ वर

## घाटकोपर पोलीस ठाण्यात बाप्पा विराजमान



● मुंबई, विशाल पाटील :

आराध्य दैवत श्री गणपती बाप्पाचे शनिवारी वाजत गाजत , गुलाल उधळत घरी आगमन होत आहे. लहानापासून मोठ्या पर्यंत सर्वांचा श्रीगणेश म्हणजे आवडीचे दैवत. गणपती बाप्पा मोरया , मंगलमूर्ती मोरया , अर्धा लाडू चंद्रावर... गणपती बाप्पा उंदरावर असा जयघोष आज सर्वत्र कानावर पडत आहे. पान २ वर

## शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी पहिला सौरऊर्जा प्रकल्प सुरू - देवेंद्र फडणवीसांचे विशेष प्रयत्न

● वैजापूर, दिगंबर जाधव :



शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 अंतर्गत राज्यात 9200 मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यापैकी 3 मेगावॅट क्षमतेचा पहिला सौरऊर्जा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील धोंदलगाव येथे कार्यान्वित करण्यात झाला. या प्रकल्पामुळे 1753 शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने शेतकऱ्यांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे. हा जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. धोंदलगाव प्रकल्प ही सुरुवात आहे. या वर्षी मार्चमध्ये प्रदान केलेल्या 9200 मेगावॅट विकेंद्रित सौर प्रकल्पांचा हा एक भाग आहे. प्रकल्पांतर्गत संपूर्ण क्षमता डिसेंबर 2025 पर्यंत टप्प्याटप्प्याने कार्यान्वित केली जाणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

धोंदलगाव येथे महावितरणच्या उपकेंद्रापासून सुमारे साडेतीन किलोमीटर अंतरावर असलेल्या 13 एकर शासकीय जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या कामासाठी महावितरणकडून संबंधित कंपनीला 7 मार्च 2024 रोजी कार्यादेश देण्यात आला तसेच 17 मे रोजी वीजखरेदी करार करण्यात आला. त्यानंतर अवघ्या साडेचार महिन्यांत प्रकल्प उभारून 5 सप्टेंबर रोजी कार्यान्वित करण्यात आला आहे. हा प्रकल्प महाविरणच्या धोंदलगाव 33 केव्ही उपकेंद्राशी जोडण्यात आला आहे. त्यामुळे उपकेंद्रातून निघणाऱ्या 5 वीजवाहिन्यांवरील 1753 शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. धोंदलगाव, नालेगाव, अमानतपूरवाडी व संजरपूरवाडी या गावांतील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. पान २ वर


## संपादकीय

# निसर्गाप्रती आपली जबाबदारी !

आजच्या घडीला जग एका निर्णायक वळणावर उभे आहे. हवामान बदल हा आता दूरचा किंवा भविष्याचा धोका राहिलेला नाही. ज्याचे परिणाम आपल्याला रोजच्या जीवनात अनुभवास येते. मानवजातीचा व इतरही जीवजंतूंचा पोशिंदा म्हणजे निसर्ग. ज्याने कधीच आपल्याकडून हवा, पाणी व मातीसाठी कुठल्याच प्रकारचा मोबदला मागितला नाही. बिनामोबदला म्हणजे फुकटच ना आणि म्हणूनच निसर्गाकडून फुकट मिळालेल्या मूल्यवान हवा, पाणी व मातीची किंमत कदाचित कवडीमोल ठरली आहे. निसर्गाची ना कुठली योजना ना कुठला पक्ष ना कुठली जात तो सर्वांसाठी एकच आहे. विचार केला तर लक्षात येईल की जेवढे आयुष्य ज्याच्यामुळे जगू शकलो त्या निसर्गाला त्याने केलेल्या उपकाराची परतफेड आपण कशी केली? बुद्धिजीवी असूनसुद्धा रोजच निसर्गावर अत्याचार सुरू आहेत.

कारण, पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची आहे, त्याला ठेच लागता कामा नये, भलेही पाणी विकत आणू, हवा विकत घेऊ माती पण विकत घेऊ आपल्याला फरक नाही पडत. किती दिवस चालेल, तर फक्त थोडे वर्ष. कारण आपल्या मानगुटीवर हवामान बदल बसलेला आहे. ज्याबद्दल महिती सर्वांना आहे; पण करायचे काहीच नाही, कारण आपण मग्न आहोत, आनंदी आहोत, ते आजचे जीवन जगण्यात, , उद्याचे काहीही घेणंदेणं नाही. समाजामध्ये ज्याला त्याला स्वतःचे महत्त्व व योग्यता, पत कायम राखायची आहे; पण जर निसर्गाने त्याची लायकी दाखविली किंवा तसे ठरवले तर तो काय दिवस असेल याचा विचार एकदा तरी झालाच पाहिजे.

शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार, जागतिक तापमानात 2 अंशने वाढ होण्याच्या जवळ येत असताना, याचे आपल्या भोवतालच्या पर्यावरणावर आणि आपल्या जीवनावर होणारे परिणाम गंभीर असतील. याबदलांशी लढण्यासाठी प्रत्येक नागरिकाला तातडीने पावले उचलावी लागतील व येणार्या हवामान संकटाशी लढण्यासाठी उशीर होण्याआधी जागृत व सतर्क राहून कृती करावी लागेल. सतत वाढत असलेल्या जागतिक तापमानाचा परिणाम केवळ उष्णतेच्या लाटांवरच नाही, तर संपूर्ण पर्यावरणावर आहे. तापमानातील 2 अंश से. वाढ ही अपरिहार्यपणे हवेच्या पाण्याच्या आणि मातीच्या गुणवत्तेत गंभीर हांस घडवून आणेल, ज्यामुळे शेवटी आपल्या अन्नाच्या आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम होईल. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनग वितळत आहेत, ज्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. यामुळे किनारपट्टीवरील शहरे आणि गावांना पुराचा धोका वाढत आहे. वातावरणातील कार्बनडाय ऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. पाणी आम्लधर्मी होत आहे. याचा परिणाम समुद्री जीवनावर आणि पाण्याच्या स्रोतांवर होत आहे. तापमान वाढीमुळे आणि दुष्काळामुळे जंगलांमध्ये वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. बरीच शहरे कित्येक वर्षे हवेच्या गुणवत्तेच्या समस्यांशी झुंज देत आहेत. यामध्ये प्रामुख्याने गाड्यांची गर्दी, अनिबंध बांधकामे आणि औद्योगिक क्रियाकलापांमुळे, शिल्लक राहिलेले कृषिधान, टाकून दिलेला कचरा आणि प्लॅस्टिक मोठ्या प्रमाणात जाळण्यात येत असल्यामुळेही प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. ज्यामुळे श्वसनाचे विकार, हृदयरोग आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची वाढण्याची शक्यता आहे. तसेच सूक्ष्मजीवांच्या जटिल संघटनांची वाढ होत आहे, जी जगात नवीन आणि बरे न होणार्या आजारांच्या निर्मितीस कारणीभूत ठरत आहे. पाण्याचे स्रोत अधिकाधिक ताणात येतील. यामध्ये विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील भागांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, जिथे आधीच पाण्याची टंचाई आहे. पाण्याचे स्रोत, जसे की नद्या, तलाव आणि जलाशय, अधिकाधिक बाष्पीभवनामुळे कमी होतील, ज्यामुळे जलसंपत्तीची गुणवत्ता घटेल. पाण्यातील प्रदूषणाचे प्रमाण वाढेल, ज्यामुळे पिण्यायोग्य पाण्याचा अभाव निर्माण होईल. जलसंवर्धन आणि व्यवस्थापनासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेतला पाहिजे. पाण्याचा वापर जपून व कसा कमी करता येईल तसेच वैयक्तिक पातळींवर पावसाचे पाणी योग्य प्रकारे कसे साठवता येईल आणि सांडपाणी पुनर्वापर कसे करता येईल, याबद्दल समाजाच्या प्रत्येक घटकामध्ये जागरूकता निर्माण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



## आजची चित्रोळी

शीतलसा पूर्ण चंद्र
चांदणें शीतलसे !
नभांगणी मोहरलें
लावते जीवा पिसें !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या...

त्यानुसार, प्रत्येक धर्मादाय रूग्णालयाने त्यांच्या रूग्णालयातील एकूण खाटांपैकी 10 टक्के खाटा निर्धन रूग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व 10 टक्के खाटा दुर्बल घटकातील रूग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे या धर्मादाय रूग्णालयांना बंधनकारक आहे. या योजनेची प्रभावी व पारदर्शी अंमलबाजावणी होत नसल्याने गोर-गरीब रुग्णांना त्याचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी विधि व न्याय विभागाचा कार्यभार घेतल्यानंतर या योजनेची प्रभावी व पारदर्शी अंमलबजावणी करण्याबाबत पाऊले उचलली. त्याचाच भाग म्हणून मंत्रालयामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयांतर्गत राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात धर्मादाय अंतर्गत सुमारे 468 रुग्णालये नोंदणीकृत असून त्यामधील सुमारे 12 हजार बेड्स निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांकरिता उपलब्ध आहेत. यामध्ये कोकीळाबेन, मुंबई, एच. एन रिलायन्स, मुंबई, सह्याद्री हॉस्पीटल, पुणे, दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे इत्यादी नामांकीत रुग्णालयांचा समावेश असून सर्व धर्मादाय योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, यासाठी कक्षामार्फत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर येथे विभागीय कार्यशाळेचे आयोजन देखील करण्यात आले होते. यामध्ये राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांनी उत्साहाने सहभाग घेतला.

निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांना या सवलतीच्या खाटा पारदर्शकपणे उपलब्ध होण्याकरिता राज्यस्तरीय विशेष मदत कक्षासाठी ऑनलाईन प्रणाली विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच सदर प्रणाली सर्वसामान्यांच्या सेवेत कार्यरत होणार आहे. त्यामुळे रुग्णांना अर्ज करणे आणखी सोपे होणार असून योजनेची पारदर्शी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या विविध योजना यांचा तुलनात्मक अभ्यास केला तर या धर्मादाय योजनेस उपचाराच्या खर्चाची कोणतीही मर्यादा नसल्याने कॅन्सर, लिव्हर ट्रान्सप्लांट, हृदय प्रत्यारोपण अशा महागड्या शस्त्रक्रिया या योजनेतून निर्धन गटातील रुग्णास मोफत करण्यात येतात. त्यामुळे गोर-गरीब रुग्णांकरिता ही योजना वरदान ठरली आहे.

सद्यस्थितीत कक्षाचे कामकाज ऑफलाईन पध्दतीने सरु असून निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मदत मिळण्यासाठी राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षास अर्जासह कागदपत्रे charityhelp.dcmo @maharashtra.gov.in या ईमेल आयडी वर मेल करु शकतात किंवा प्रत्यक्ष कक्षात आणून देवू शकतात.

धर्मादाय रूग्णालयातील बेड मिळण्याकरिता रूग्णास त्याचा, नातेवाईकांचा अर्ज, लोकप्रतिनिधींचे पत्र, आधार कार्ड / ओळखपत्र, रेशनकार्ड / तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला, डॉक्टरांचे प्रिस्क्रीप्शन आवश्यक आहे.

राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष योजनेचा निर्धन व दुर्बल रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### राज्यात परिवर्तन करण्याची जनतेची मानसिकता;...

पत्रकाराच्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात गुंतवणूक वाढली असा देवेंद्र फडणवीस यांचा दावा आहे तर मग राज्यात बेकारीचे प्रमाण प्रचंड का आहे? बेकारी कमी का होत नाही? याची उत्तरे फडणवीस यांनी द्यावीत. भाजपा व फडणवीस सातत्याने खोटे बोलून जनतेची दिशाभूल करत आहेत, असेही पटोले म्हणाले.

या पत्रकार परिषदेला मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड, प्रदेश सरचिटणीस ब्रिजकिशोर दत्त आदी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचा विक्रम...

तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून रुग्णांनी अर्थसहाय्य मिळविण्याची प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहे. याबाबत जनजागृती करुन जास्तीत जास्त रुग्णालये या योजनेत जोडण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश करण्यात आला आहे.

दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

अवघ्या एक वर्षाची दुवा बनली मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची ब्रॅण्ड अँबेसेडर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या ब्रॅण्ड ॲम्बेसडर पदी अवघ्या एक वर्षाच्या दुवा नावाच्या चिमुकलीची निवड करण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील फहरीण मकुबाई आणि सादिक मकूबाई या दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अवघ्या 13 दिवसांच्या बाळाचे प्राण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे वाचले होते.

### घाटकोपर पोलीस ठाण्यात बाप्पा विराजमान

24 तास सुरक्षेसाठी रस्त्यावर उभे राहून उत्सव निर्विघ्न पार पाडणारे खाकी वर्दीतील पोलिसांना देखील बाप्पाचा उत्सव साजरा करावासा वाटतो हे विशेष आहे. आज घाटकोपर पोलीस ठाण्यात उपयुक्त पुरुषोत्तम कराड आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळवंत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगणेश उत्सव साजरा होत आहे. आज श्रीगणपती बाप्पाचे पोलीस ठाण्यात आगमन झाले. पोलीस निरीक्षक दिपाली कुलकर्णी , पोलीस निरीक्षक अशोक पारधी यांनी गणपती बाप्पाची मूर्ती चालत मिरवणूक काढत , बाप्पाचा जयघोष करत पोलीस ठाण्यात नेले. यावेळी पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी उपस्थित होते.

घाटकोपर पोलीस ठाण्यात दरवर्षी दहा दिवसांचा उत्सव साजरा होतो. दहा दिवस विविध कार्यक्रम आखले जातात. यंदा मराठ मोळा सांस्कृतिक कार्यक्रम देखील पोलीस ठाण्यात होणार असल्याचे पोलीस निरीक्षक दिपाली कुलकर्णी यांनी सांगितले. पोलीस ठाण्यातील श्रीगणपती बाप्पाचे विसर्जन हे महानगर पालिकेच्या कृत्रिम तलावात केले जाते.

### शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी पहिला...

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 30 जून 2020 रोजी सत्तेची सूत्रे स्वीकारल्यानंतर किमान तीस टक्के कृषी फीडर्स डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मिशन 2025 जाहीर केले होते. त्यानंतर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली.

16 हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास शासनाने मान्यता

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 चा विस्तार करून त्याची व्याप्ती वाढविण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. मिशन मोडवरील या योजनेतून सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट 7 हजार मेगावॅटने वाढवून 16 हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा क्षमता निर्मिती उद्दिष्टास शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे राज्यातील शंभर टक्के कृषी पंप ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे.

सौर ऊर्जेचा वापर करून वीज निर्माण करायची व त्याच्या आधारे कृषी पंप चालवायचे अशी ही योजना आहे. त्यासाठी राज्यात विविध ठिकाणी विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जा निर्मिती केंद्रे उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होण्यासोबत स्वस्तात वीज उपलब्ध झाल्याने उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करण्याची संधी भविष्यात मिळणार आहे. या योजनेमुळे कृषी क्षेत्राला मोलाची मदत करण्यासोबतच उद्योगांनाही प्रोत्साहन मिळणार आहे.

### राष्ट्रवादीच्या जेष्ठ मंत्र्याच्या घरातच फूट, मुलगी...

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले असून त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबंधणी सुरु केली आहे. शुक्रवारी गडचिरोली जिल्ह्यातील आलापल्ली येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत 'जनसन्मान यात्रा' पार पडली. यावेळी झालेल्या भाषणादरम्यान मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी मोठी मुलगी भाग्यश्री आत्राम व जावई ऋतुराज हलगेकर यांचे नाव घेत यांच्याशी आपले संबंध तुटले असे जाहीर केले. आजपर्यंत सर्व काही दिल्यावरही ते आज माझ्या विरोधात उमेदवारीसाठी दुसऱ्या पक्षात प्रवेश करणार आहेत. आजपर्यंत दुसऱ्यांची घरे फोडणाऱ्यांनी आज माझे पण घर फोडले असे आत्राम म्हणाले. यावेळी ते भावूक झाले होते.

उमेदवारीवरूनच वादाला सुरुवात

गेली अनेक वर्ष आत्राम यांची मुलगी आणि जावई त्यांच्यासोबत राजकारणात सक्रिय होते. यादरम्यान मुलीने जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती, सिनेट सदस्य अशा पदावर काम केले आहे. परंतु, मागील काही दिवसापासून त्यांच्यात विधानसभा उमेदवारीवरून वाद निर्माण झाला होता. यातूनच मुलगी आणि जावई यांनी वेगळा मार्ग निवडण्याचा निर्णय घेतला अशी चर्चा आहे.

मुलगी आणि जावयाला नदीत बुडवा

गेल्या काही दिवसांपासून आत्राम यांची मुलगी शरद पवार गटात प्रवेश करणार आहे. असा दावा अनिल देशमुख आणि इतर नेत्यांनी केला होता. यावर आज आत्राम यांनी स्वतः शिक्कामोर्तब केले आहे. ते म्हणाले, माझी मुलगी माझी होऊ शकली नाही, ती दुसऱ्यांची कशी होऊ शकेल, असा सवाल करीत आत्राम यांनी मुलगी आणि जावयास नदीत बुडवून टाका, अशा शब्दांत आपला संताप व्यक्त केला. माझी एक मुलगी आणि जावई जरी आपल्याला सोडून जात असले तरी दुसरी मुलगी, मुलगा, भाऊ, पुतण्या हे माझ्यासोबत आहेत. त्यामुळे मला चिंता नाही, असेही ते म्हणाले.

### सिंगापूरच्या सरन्यायाधीशांच्या उपस्थितीत मराठा...

मुंबई उच्च न्यायालयाचं कामकाज पाहण्यासाठी ते न्यायालयात आले होते. त्याचवेळी मराठा आरक्षणाची सुनावणी सुरू होती. त्यामुळं सुंदरेश मेनन यांनी या याचिकेचं कामकाज पाहिलं. सरन्यायाधीश सुंदरेश मेनन यांचा 'सेरीमोनियल बेंच'मध्येही समावेश होता.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी व न्यायमूर्ती फिरदौश एस. पुनीवाला यांच्या खंडपीठासमोर मराठा आरक्षण संदर्भातील सुनावणी गुरुवारी आणि शुक्रवारी पार पडली. या दुर्मीळ सुनावणीचा अनुभव घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात वकिलांनी न्यायालयात गर्दी केली होती.

सिंगापूर सर्वोच्च न्यायालयाचे आणखी दोन न्यायमूर्ती मुंबई उच्च न्यायालयातील दुसऱ्या दोन खंडपीठांचा भाग म्हणून उपस्थित होते. न्यायमूर्ती रमेश कन्नन हे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन जामदार व न्यायमूर्ती एम. एम. साठ्ये यांच्या खंडपीठामध्ये सहभागी झाले होते. तर आणखी एक न्यायमूर्ती एन्ड्रे फ्रँन्सिस मेनियम यांचा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के. आर. श्रीराम व न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठामध्ये समावेश होता. या सर्वांनी मुंबई उच्च न्यायालयाचं कामकाज जवळून पाहिलं.न्यायालयात सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती तसंच वकील हे नेहमी काळा कोट घालून उपस्थित राहतात. मात्र, सिंगापूरचे सरन्यायाधीश सुंदरेश मेनन हे निळ्या रंगाचा कोट व टाय लावून सुनावणीसाठी खंडपीठात बसले होते. सिंगापूर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश असल्यानं त्यांना हा सन्मान दिला असल्याचं बोललं जातंय.

### घोडबंदर मार्गावरील उड्डाणपूलावर पुन्हा...

शुक्रवारी सकाळी पुन्हा अपघाताचा फटका नागरिकांना सहन करावा लागला. ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने एसटी बसगाडी वाहतुक करत होती. बसगाडी मानपाडा उड्डाणपूलाजवळ आली असता, उड्डाणपूलाच्या कठड्याला बसगाडी धडकली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वाहतुक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. बसगाडीमध्ये प्रवासी नसल्याचे पोलिसांनी सांगितले. काही दिवसांपूर्वीच पातलीपाडा येथे असेच दोन अपघात अवजड वाहनांचे झाले होते. वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज जयंती. मात्र आज त्यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे कोणालाही वाटत नाही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म आजच्याच दिवशी ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर



अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उतरेली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# 'घोडबंदर रोडवरील वाहतुकीच्या परिस्थितीत सुधारणा तत्काळ होईल' महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली ग्वाही

■ आमदार प्रताप सरनाईक आणि घोडबंदरवासियांचे प्रतिनिधी यांच्यासह झाली बैठक

■ वाहतूक पोलीस, महापालिका, मेट्रो, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम यांचे प्रतिनिधीही उपस्थित



**ठाणे** : घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी विविध उपाय योजले जात आहेत. त्याचा परिणाम नागरिकांना लवकरच दिसू लागेल. आज असलेल्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी तातडीच्या आणि दीर्घ मुदतीच्या उपाययोजना हाती घेण्यात येत असल्याचे प्रतिपादन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले.

घोडबंदर रोडवरील वाहतुकीच्या समस्यांबाबत तोडगा काढण्यासाठी महापालिका मुख्यालयात शुक्रवारी सायंकाळी बैठक झाली. या बैठकीस, आमदार प्रताप सरनाईक, घोडबंदर रोड येथे राहणाऱ्या नागरिकांचे प्रतिनिधी, पोलीस उपायुक्त (वाहतूक) दिपक शिरसाठ, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, शहर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्यासह वाहतूक पोलीस, महापालिका, मेट्रो, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

या बैठकीत नागरिकांनी, अवजड वाहनांच्या वेळा, रस्त्याची स्थिती, सेवा रस्त्यावरील पार्किंग, हातगाड्या, सिग्नल यंत्रणा, लेन मार्किंग, फ्लायओव्हरची स्थिती, वाहतुकीचे नियम मोडणारे नागरिक आदी समस्या मांडल्या. या समस्यांमुळे नागरिकांचे विशेषत: शाळकरी मुलांचे होणारे हाल होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

आमदार प्रताप सरनाईक यांनीही नागरिकांच्या समस्यांना दुजोरा दिला. त्याचबरोबर, घोडबंदर रोडवरील अवजड वाहतूक बंद व्हावी यासाठी भविष्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे राज्य सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती यावेळी नागरिकांना दिली. तसेच, अवजड वाहनांच्या वेळा पाळणे आणि बेकायदा पार्किंग थांबवणे यावर पोलिसांनी काटेकोर अमलबजावणी करावी, असेही सरनाईक म्हणाले. नागरिकांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दलही सरनाईक यांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाण्यातील समस्यांबाबत अतिशय संवेदनशील आहेत. घोडबंदर रोड येथील समस्यांची त्यांना कल्पना आहे. ते त्याबद्दल सातत्याने निर्देश देत असतात. आताही गणपती विसर्जनापूर्वी सगळे रस्ते, फ्लायओव्हर हे खड्डेमुक्त करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

आजच्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे, अवजड वाहनांच्या प्रवेशाची नियमावली काटेकोरपणे पाळली जावी. वाहतूक विभागाच्या मदतीसाठी सध्या ५० वॉर्डन आहेत. त्यांना आणखी १०० वॉर्डन तातडीने उपलब्ध करून देण्यात यावेत. त्यांचे नियोजन कापूरबावडी ते गायमुख या पट्ट्यात करण्यात यावे. वाहतूक पोलीस आणि वॉर्डन हे सकाळी सहा वाजल्यापासूनच रस्त्यावर तैनात असतील. सकाळी ६ ते १० आणि सायं. ५ ते ९ या काळात त्यांची विशेष ड्युटी असेल, असे आयुक्त राव यांनी सांगितले. रस्त्याची स्थिती सुधारण्यासाठी पालिका तत्काळ उपाययोजना करीत असून त्याचे परिणाम १५ दिवसात दिसू लागतील. लेन मार्किंग, दिशा दर्शक, फ्लायओव्हरवरील प्रवेशापासून डिव्हायडर, झेब्रा क्रॉसिंग, जिथे रात्रीच्या वेळी जादा प्रकाशाची व्यवस्था हवी आहे तिथे ती सोय करण्यात येईल, असेही आयुक्त राव म्हणाले. सेवा रस्त्यावरील पार्किंग थांबवणे, हातगाड्या काढणे हे काम महापालिका तातडीने करणार आहे. तसे निर्देश स्थानिक उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांना आयुक्त राव यांनी दिले. कार्यकारी अभियंता संजय कदम हे महापालिकेच्या वतीने संबंधित नागरिक, यंत्रणा यांच्याशी नोडल ऑफिसर म्हणून समन्वय साधतील. घोडबंदर रोड ही ठाणे महापालिकेचीच पूर्णपणे जबाबदारी आहे. कोणतीही जबाबदारी पालिका ढकलणार नाही, असेही यावेळी आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

## माँ साहेब मिनाताई ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त मिनाताई ठाकरे चौकात गोर गरीबांना फळ वाटप

**ठाणे -:** तमाम शिवसैनिकांच्या लाडक्या माँ साहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त ठाण्यातील कॅसलमिल नाका येथील मीनाताई ठाकरे चौकात शिवसेना उपनेते, मा. आमदार, मा. महापौर स्व. अनंत तरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत असलेल्या माँ साहेबांच्या स्मृतीदिना प्रित्यर्थ शुक्रवारी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने माँ साहेबांच्या अर्थ पुतळयाला अभिवादन करुन गोर गरीबांना फळ वाटप करण्यात आली.



माँ साहेबांच्या स्मृतीदिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला व ज्यांच्या मार्गदर्शनाखाली माँ साहेबांच्या स्मृतीदिन साजरा होत आला ते शिवसेना उपनेते स्व. अनंत तरे यांच्या तस्बीरीला पुष्पहार अर्पण करुन दिप प्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर माँ साहेब मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाला पुष्पहार ठाणे लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार राजन विचारे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आला. तर माँ साहेबांच्या पुतळयाची पुजा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्याच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गरीबांना फळ वाटप करण्यात आले.

या प्रसंगी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे ठाणे लोकसभेचे माजी खासदार राजन विचारे, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, ठाणे शहरप्रमुख प्रदिप शिंदे, ठाणे शहर समन्वयक संजय तरे, ठाणे जिल्हा महिला उप जिल्हाप्रमुख महेश्वरी तरे, माजी नगरसेविका विद्या कदम, वृंदावन श्रीरंग विभागाचे विभागप्रमुख मयुर पैलकर, महिला विभागप्रमुख नंदा कोथळे, विभाग समन्वयक योगेश भोईर, विभागप्रमुख हेमचंद राठीवडेकर, विभागप्रमुख भालचंद्र देसाई, उपविभागप्रमुख मनोज पाटील, महिला उप विभागप्रमुख राजश्री सुर्वे, युवा सेना शाखा अधिकारी सागर माने, शाखाप्रमुख धनंजय येंडे, उप शाखाप्रमुख मंदार घोरपडे, वृंदावन उप शाखाप्रमुख विलास घाग, महिला उप विभाग संघटक अनुराधा चव्हाण, महिला शाखा संघटक जयश्री बामगुडे, भुपेंद्र सिंग आठवल, तुकाराम डोंगरे, डॉ. दिपक चांगलानी, बाबु देशमुख, बळीराम दळवी, सुर्यकांत शिंदे, मोहन देशमुख, संजय यादव, संतोष गवई, सुनिल भोईर आदी शिवसैनिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना ठाणे शहर समन्वयक संजय तरे व ठाणे जिल्हा महिला उप संघटक महेश्वरी तरे तसेच आझादनगर शाखेचे शाखाप्रमुख संतोष दंत व महिला शाखा संघटक जयश्री बामगुडे यांनी केले.

## मुंबई उच्च न्यायालय न्यायमूर्तींच्या प्रमुख उपस्थितीत रबाळे येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा संपन्न

**ठाणे** (जिमाका) : मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती गौरी गोडसे यांच्या मुख्य उपस्थितीत महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई सह ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बेलापूर तालुका विधी सेवा समिती आणि नवी मुंबई महानगरपालिका आयोजित कायदेविषयक महाशिबीर राजर्षी शाहू महाराज विद्यालय, नवी मुंबई म.न.पा. शाळा क्र.५५. रबाळे येथे दि.०१ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाले.

हा कार्यकम ठाणे जिल्हा प्रमुख न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, ठाणे जिल्हा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे तसेच ठाणे जिल्ह्यातील न्यायीक अधिकारी, विधीज्ञ, सामाजिक संस्था, विधी महाविद्यालय यांच्या उपस्थितीत पार पडला. या शिबिरात ३० स्टॉल उभारले गेले असून एक ते दिड हजार नागरिकांनी याचा लाभ घेतला. तसेच शासनाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. यात घरेलू कामगार, बांधकाम कामगार, विधवा स्त्रिया, दिव्यांग व्यक्ती, इ. यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश समाजातील सर्व गरीब, वंचित, दुर्बल, घटकांपर्यंत कायद्याची जनजागृती करणे व शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे हा होता. त्यानुषंगाने या कार्यक्रमात मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती गौरी गोडसे यांनी महिलांच्या सुरक्षेबाबत त्यांचे परखड मत मांडले. कायद्यात स्त्रियांच्या संरक्षणासाठी अतिशय चोख अशा तरतुदी आहेत आणि त्या तरतुदींची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. समाजाची बदलती मानसिकता कायद्याच्या कठोर अंमलबजावणीमुळे नियंत्रणात राहू शकते, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

या शिबिरात ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या कायदेविषयक मोफत सुविधा, लोकअभिरक्षक कार्यालय, तुरुंगामधील कैद्यांकरिता असलेल्या सुविधांची माहिती तसेच महिला, बालक, वृद्ध यांना कायद्यातील संरक्षण व त्यावर जनजागृती संबंधित माहितीकरिता स्टॉल उभारण्यात आले होते.



ठाणे - प्रसन्न हसत बाप्पाला घरी नेण्यासाठी जमलेले भक्त. - छाया, मनोज सिंह

## वाघबीळ परिसरात गणपती विसर्जनासाठी विशेष सोय, स्थानिक मा. नगरसेविका अर्चना मणेरा आणि डॉक्टर मणेरा यांचा स्तुत्य उपक्रम.

**ठाणे -:** वाघबीळ परिसरातील गणपती विसर्जनाच्या अडचणी दूर करण्यासाठी स्थानिक माजी नगरसेविका अर्चना मणेरा आणि समाजसेवक डॉक्टर किरण मणेरा यांच्या वतीने वाघबीळ खाडीवर खास विसर्जन व्यवस्था उभारण्यात आली आहे, ज्यामुळे नागरिकांना आता सहजतेने आणि सुरक्षितपणे विसर्जन करता येणार आहे.

दरवर्षी गणपती विसर्जनाच्या वेळी वाघबीळ खाडी किनाऱ्यावर चिखलाचा मोठा त्रास होत असे. स्थानिक गावकरी आणि भाविकांना खोल चिखलात उतरून गणपती विसर्जन करावे लागत होते, ज्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या परिस्थितीचा विचार करून, यावर्षी भारतीय जनता पक्षाच्या ठाणे महानगर पालिकेच्या स्थानिक माजी नगरसेविका अर्चना मणेरा यांनी खाडी परिसरात एक उत्तम विसर्जन व्यवस्था निर्माण केली आहे. या व्यवस्थेत, खाडी किनाऱ्यावर एक तरंग प्लॅटफॉर्म उभारण्यात आला आहे, ज्यामुळे भाविकांना आता गणपती विसर्जन करताना चिखलाचा सामना करावा लागणार नाही. यामुळे गणेश भक्तांना सुरक्षित आणि सोयीस्करपणे विसर्जनाची प्रक्रिया पूर्ण करता येईल.



आज भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले यांच्या उपस्थितीत माजी नगरसेविका अर्चना किरण मणेरा आणि स्थानिक नागरिक, कार्यकर्त्यांनी या व्यवस्थेचा शुक्रवारी पाहणी दौरा केला. विसर्जनाची उत्कृष्ट सोय बघून नागरिकांनी अर्चना किरण मणेरा यांचे मनःपूर्वक कौतुक केले. गावातील गणेश भक्तांनी यावेळी समाधान व्यक्त केले, कारण आता त्यांना आपल्या लाडक्या बाप्पाला योग्य पद्धतीने निरोप देता येणार आहे. वाघबीळ परिसरातील या विशेष व्यवस्थेमुळे गणपती विसर्जनाची प्रक्रिया आता अधिक सुलभ आणि सुरक्षित झाली आहे.

## मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील सी.सी.टीव्हींसाठीचे "मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्ष" या कामाचा ऑनलाईन लोकार्पण सोहळा संपन्न

**मिरा भाईंदर** - मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील सी.सी. टीव्हींसाठीचे "मध्यवर्ती शाळा नियंत्रण कक्ष" या कामाचे ऑनलाईन लोकार्पण सोहळा संपन्न झाला. मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि सुरक्षेचा विषय कायम संवेदनशीलपणे हाताळत आली आहे. मिरा भाईंदर शहरातील मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी 36 शाळांमध्ये आधीपासून कार्यान्वित असलेले 200 सी.सी. टी.व्ही. कॅमेरे एकाच ठिकाणी केंद्रित करून त्यावर देखरेख आणि नियत्रंण ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महानगर पालिकेचे मा. आयुक्त यांच्या विशेष मार्गदर्शखाली तयार केलेल्या अद्यावत अश्या मध्यवर्ती शाळा नियत्रंण कक्षाचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते पार पडले. सदर उपक्रम राबविणारी मिरा भाईंदर महानगरपालिका ही राज्यातील पहिली महापालिका ठरली आहे. इतर महापालिकांनी सुद्धा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आदर्श घेऊन सदर उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी सक्षम रहावे असे मनोगत मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री यांनी व्यक्त केले व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा दिल्या.



अत्याधुनिक सर्व्हर आणि विशेष कार्यप्रणालीयुक्त असा यु.पी.एस. जनरेटर बॅकअप असलेल्या नियंत्रण कक्षात एकाच वेळी साधारण एक हजार सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांवर नजर ठेवणारी अद्यावत यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या कक्षात संगणक, व्हिडिओ वॉल, सभाकक्ष, एक बॅकअप सर्व्हर, देखरेख ठेवण्यासाठी असलेले अधिकारी व कर्मचारी आणि प्रशस्त वातानुकूलित जागा असलेल्या या कक्षात सद्यस्थितीत मनपा शाळा यांच्यावर लक्ष केंद्रित केले असून भविष्यात मिरा भाईंदर शहरातील सर्व खाजगी शाळेतील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुद्धा या उपक्रमात समाविष्ट करण्यात येतील. या नियत्रंण कक्षात कार्यरत असलेले पथक मनपा शाळेतील सीसीटीव्ही फुटेज सकाळी सात ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तपासण्याचे व त्याचे जतन करण्याचे काम करतील. मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उचललेल्या या महत्त्वपूर्ण पावलामुळे भविष्यात घडणाऱ्या अनुचित घटनांवर कायमस्वरूपी आळा बसुन हा विषय अतिशय संवेदनशीलपणे हाताळण्यात नक्कीच मदत होणार आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार व मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कक्ष सुरू झाला असून या कक्षाद्वारे विद्यार्थांच्या विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षितेचा प्रश्न अतिशय संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी उचलले गेलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. सदर कार्यक्रमास मा. आयुक समवेत मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक, मधुकर पांडे पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार शहर, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, नगरसचिव वासुदेव शिरवळकर, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, व मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# सहा महिने कोमात राहिलेल्या कपिल परमारने ज्युडोमध्ये पटकावले ऐतिहासिक कांस्यपदक, पंतप्रधान मोदींनी केले कौतुक

भारताचा पॅरा ज्युडोपटू कपिल परमारने चमकदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. कपिलने पुरुषांच्या ६० किलो वजनी गटाच्या J1 स्पर्धेच्या कांस्यपदकाच्या लढतीत ब्राझीलच्या एलिटॉन डी ऑलिव्हेराचा पराभव केला. त्याने एलिटॉन १०-० असा पराभव करत कांस्य मिळवण्यात यश मिळवले. यासह कपिलने इतिहासही घडवला आहे. कारण पॅरालिम्पिक किंवा ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारा तो भारतातील पहिला ज्युडोपटू ठरला आहे. त्यामुळे पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या पदकांची संख्या २५ पोहोचली आहे. यानंतर पंतप्रधान मोदींनी कपिल परमारच्या कामगिरीचे कौतुक केले.

पीएम मोदींनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कपिल परमारच्या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक केले. पोस्टमध्ये पंतप्रधानांनी लिहिले, "एक अतिशय संस्मरणीय खेळातील कामगिरी आणि एक विशेष पदक. कपिल परमार पॅरालिम्पिक स्पर्धेतील ज्युडोमध्ये पदक जिंकणारा पहिला भारतीय ठरल्याबद्दल त्याचे खूप खूप अभिनंदन. पॅरालिम्पिक २०२४ मधील



पुरुषांच्या ६० किलो (जे1) वजनी गटात देशासाठी दमदार कामगिरी करत ज्युडोमध्ये कास्य पदक जिंकल्याबद्दल कपिल परमारचे अभिनंदन आणि त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!"

२०२२च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत परमारने याच प्रकारात रौप्य पदक जिंकले होते. त्याने उपांत्यपूर्व फेरीत व्हेनेझुएलाच्या मार्को डेनिस ब्लँकोचा १०-० ने पराभव केला, परंतु उपांत्य फेरीत इराणच्या एस बनिताबा खोर्रम अबादीकडून पराभव पत्करावा लागला. परमारला दोन्ही सामन्यात प्रत्येकी एक पिवळे कार्ड मिळाले. कपिलला सुवर्णपदक मिळवून देता आले नसले तरी कांस्यपदक जिंकण्यात तो यशस्वी ठरला. जे खेळाडू अंध आहेत किंवा कमी दृष्टी आहेत ते पॅरा ज्युडोमध्ये J1 श्रेणीत सहभागी होतात.

भारतीय पॅरालिम्पिक समितीने या स्पर्धेपूर्वी किमान २५ पदके जिंकण्याची अपेक्षा व्यक्त केली होती आणि हे लक्ष्य साध्य झाले आहे. यामुळे येथील पॅरा खेळाडूंची कामगिरी अपेक्षेपेक्षा जास्त असेल. मात्र, सुवर्णपदक जिंकण्याचा दुहेरी आकडा गाठण्याची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. पॅरिस गेम्समध्ये भारताने आतापर्यंत पाच सुवर्ण, नऊ रौप्य आणि ११ कांस्यपदके जिंकली आहेत. कपिल परमार हा मध्य प्रदेशातील शिवोर नावाच्या छोट्या गावातील रहिवासी आहे. परमारचा लहानपणी अपघात झाला होता. गावातील शेतात खेळत असताना चुकून त्याचा पाण्याच्या विद्युत पंपाला स्पर्श झाला. त्यामुळे त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. यानंतर बेशुद्ध झालेल्या परमारला रुग्णालयात नेण्यात आले आणि सहा महिने तो कोमात राहिला.

## सारा आणि कार्तिकचं एकमेकांना आलिंगन



सारा अली खान आणि कार्तिक आर्यन बॉलिवूडमधील फ्रेश ऑनस्क्रीन जोडी आहेत. ते दोघे 'लव्ह आज कल २' या सिनेमात एकत्र दिसले होते. सिनेमातील जोडीप्रमाणेच, हे दोघे खऱ्या आयुष्यातही एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा माध्यमांमध्ये होत्या. अनेक दिवस ही चर्चा सुरू राहिल्यानंतर, दोघांमध्ये ब्रेकअप झाल्याच्या बातम्या पुढे आल्या. कार्तिकने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत, साराचं नाव न घेता, कोणतंही नातं संपल्यावर ते सार्वजनिक चर्चेचा विषय होऊ नये, असं म्हटलं होतं. कार्तिकच्या या वक्तव्यामुळे सारा आणि त्याच्यात कोणतंही नातं नाही, असं सर्वांना वाटलं होतं. परंतु, नुकत्याच 'कॉल मी बे' या वेबसिरीजच्या स्क्रिनिंगला सारा आणि कार्तिक एकत्र दिसलेआणि चाहत्यांच्या भुवया उंचावल्या. ते फक्त एकत्रच नव्हते, तर दोघांनी एकमेकांना मिठीही मारली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमुळे दोघे पुन्हा डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या व्हिडीओत सारा, कार्तिकसह अनन्या पांडे सुद्धा दिसत आहे. सारा अली खान , कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे एकत्र उभे राहून हास्यसंवाद करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओनंतर चाहत्यांनी सारा आणि कार्तिक पुन्हा डेट करत आहेत का, अशी चर्चा सुरू केली आहे. एका चाहत्याने व्हिडीओखाली कमेंट करत लिहिलं आहे, "तुम्ही दोघे लग्न करा, प्लीज," तर दुसऱ्या एका चाहत्याने विचारलं आहे, "हे पुन्हा डेट करत आहेत का?" एका फॅनने विचारलं, "हे दोघे पुन्हा कुठला सिनेमा एकत्र करणार आहेत का?" सोशल मीडियावर यावरील कमेंट्सना उधाण आलं आहे.

## मेसी, रोनाल्डो यांना वगळले! बॅलन डी'ओर पुरस्काराची नामांकन यादी जाहीर

फुटबॉलविश्वात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या बॅलन डी'ओर पुरस्काराची नामांकन यादी जाहीर करण्यात आली असून २००३ सालानंतर प्रथमच लिओनेल मेसी आणि ख्रिास्तियानो रोनाल्डो यांना त्यात स्थान मिळालेले नाही.गेली दोन दशके मेसी आणि रोनाल्डो यांनी या पुरस्कारावर वर्चस्व गाजवले होते. गतविजेत्या मेसीने विक्रम आठ वेळा, तर रोनाल्डोने पाच वेळा बॅलन डी'ओर पुरस्कार आपल्या नावे केला आहे. मात्र, यंदा ३० खेळाडूंच्या यादीतून या दोघांनाही वगळण्यात आले आहे. २८ ऑक्टोबरला होणाऱ्या विशेष सोहळयात बॅलन डी'ओर पुरस्कार प्रदान केला जाईल. गतहंगामात चॅम्पियन्स लीग आणि ला लिगा जिंकणाऱ्या स्पॅनिश क्लब रेयाल माद्रिदमधील ज्युड बेलिंगहॅम, फेडेरिको वाल्वर्डे, टोनी क्रूस, व्हिनिशियस ज्युनियर, डॅनी कार्वाहाल आणि अँटोनियो रुडिगर यांना या पुरस्कारासाठी मानांकन मिळाले आहे. युरो स्पर्धा जिंकणाऱ्या स्पेन संघातही कार्वाहालचा समावेश होता.स्पेनच्या जेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावणारे निको विल्यम्स (अॅथलेटिक क्लब), डॅनी ओल्मो (बार्सिलोना), रॉड्री (मँचेस्टर सिटी), लेमिन यमाल (बार्सिलोना) यांनाही या यादीत स्थान मिळाले आहे.



## आधी 'हिरवा निसर्ग' आता 'सुपारी फुटली'! 'नवरा माझा नवसाचा २' मध्ये आहे सोनू निगमचं खास गाणं

सचिन व सुप्रिया पिळगांवकर, अशोक सराफ अशी दमदार स्टारकास्ट असणारा 'नवरा माझा नवसाचा' चित्रपट २००४ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. गेल्या अनेक वर्षांपासून 'नवरा माझा नवसाचा' चित्रपटाच्या सीक्वेलची मागणी प्रेक्षकांकडून वारंवार करण्यात येत होती. अखेर सर्व चाहत्यांनी इच्छा आता लवकरच पूर्ण होणार असून 'नवरा माझा नवसाचा' चित्रपटाचा दुसरा भाग आता येत्या २० सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला. या ट्रेलरला प्रेक्षकांकडून देखील




भरघोस प्रतिसाद मिळत आहे. अशातच आता चित्रपटाच्या टीमने शेअर केलेल्या आणखी एका व्हिडीओने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'नवरा माझा नवसाचा' या पहिल्या भागात प्रसिद्ध गायक सोनू निगमने गायलेलं "हिरवा निसर्ग..." गाणं सर्वत्र लोकप्रिय झालं होतं. हे सहाबहार गाणं आजही प्रत्येकाच्या ओठावर असतं. आता दुसऱ्या भागात सुद्धा सोनू निगम एक खास गाणं गाणार आहे. सोनू निगम चित्रपटात कोणतं गाणं गाणार याची अपडेट 'नवरा माझा नवसाचा २'च्या टीमकडून अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आली आहे. 'सुपारी फुटली' हे गाणं सोनूने दुसऱ्या भागात गायलं आहे. हे गाणं गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर म्हणजेच उद्या ( ७ सप्टेंबर ) प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सोनू निगमचा सेटवरचा BTS व्हिडीओ सध्या चर्चेत आला आहे. याशिवाय 'हिरवा निसर्ग' गाण्याची लोकप्रियता पाहता सोनू निगम दुसऱ्या भागातही गाणं गातोय हे पाहून अनेकांनी आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान, वॅकी आणि त्याचे कुटुंबीय यावेळी एसटी सोडून कोकण रेल्वेने गणपती पुळयाला का निघालेत या सगळया प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना २० सप्टेंबरला चित्रपटगृहात मिळणार आहेत. अभिनेते सचिन पिळगांवकर, अभिनेत्री सुप्रिया पिळगांवकर, महाराष्ट्र भूषण अशोक सराफ, स्वप्नील जोशी, हेमल इंगळे, निर्मिती सावंत, वैभव मांगले आणि सिद्धार्थ जाधव अशी दमदार स्टारकास्ट या चित्रपटात झळकणार आहे.

## दिनविशेष

### घटना

१९७९: दिवाळखोरी टाळण्यासाठी खायसलर कॉर्पोरेशन ने अमेरिकन सरकारकडे १.५ बिलियन डॉलर्सची मागणी केली.

१९७८: मधुमेह नियंत्रित करण्यासाठी उपयोगी पडणारे इन्सुलिन प्रथमच जनुक अभियांत्रिकी पद्धतीने तयार करण्यात यश. १९५३ : निकिता ख्रुश्चेव सोविएत संघाच्या सर्वेसर्वापदी.

१९३१ : दुसऱ्या गोलमेज परिषदेची सुरुवात झाली.

१९२३ : इंटरनॅशनल क्रिमिनल पोलीस ऑर्गनायझेशन (इंटरपोल) ची स्थापना झाली.

१९०६ :बँक ऑफ इंडिया ची स्थापना झाली. ही भारतात स्थापन झालेली पहिली स्वदेशी व्यापारी बँक आहे.

१८२२ : ब्राझिलला पोर्तुगालपासून स्वातंत्र्य मिळाले.

१८१४ : दुसऱ्या बाजीरावाने पांडुरंग कोल्हटकराच्या साहाय्याने उंदेरी-खांदेरी किल्ल्यांचा ताबा परत मिळवला.

१६७९: सिद्दी जौहर आणि इंग्रजांचा मारा रोखत मराठ्यांनी खांदेरी किल्ल्याभोवती एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण केला.

### जन्म

१९७० : जे एडेलसन - अमेरिकन इंटरनेट उद्योजक, डिग कंपनीचे सहसंस्थापक

१९६७: आलोक शर्मा - भारतीय इंग्लिश अकाउंटंट आणि राजकारणी

१९४८: शेख खलिफा बिन झायेद बिन सुलतान अल नाह्यान संयुक्त अरब अमिरातीचे (UAE) २रे अध्यक्ष, अबू धाबीचे शासक (निधन : १३ मे २०२२)

१९४० : चंद्रकांत खोत लेखक व संपादक

१९३४: बी. आर. इशारा - चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक (निधन: २५ जुलै २०१२ )

१९३४ : सुनील गंगोपाध्याय - बंगाली कवी व कादंबरीकार (निधन: २३ ऑक्टोबर २०१२)

### मृत्यू

२०२२ : रामचंद्र मांझी भारतीय लोकनर्तक

२०२० : गोविंद स्वरूप - भारतीय रेडिओ खगोलशास्त्रज्ञ (जन्म: २३ मार्च १९२९)

२०२० : अक्किनेनी नागार्जुन दक्षिण भारतीय चित्रपट अभिनेते (जन्म: २९ ऑगस्ट १९५९)

१९९४ : टेरेन्स यंग चिनी- इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (जन्म: २० जून १९१५)

१९९१: रवि नारायण रेड्डी - कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सहसंस्थापक (जन्म: ५ जून १९०८)

१९८१: एडविन अल्बर्ट लिंक - फ्लाइट सिम्युलेटरचे शोधक (जन्म: २६ जुलै १०९४)

१९७९ : जे. जी. नवले कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक (जन्म: ७ डिसेंबर १९०२)

१९५३ : बी. रघुनाथ लेखक, कवी (जन्म: १५ ऑगस्ट १९१३)

## महाराष्ट्रात कर्करोगबाधित रुग्णांची नोंदणी बंधनकारक कधी करणार ?

भारतामध्ये महाराष्ट्रात कर्करोगबाधित रुग्ण आणि मृत्यूचे प्रमाण उत्तरप्रदेशनंतर सर्वाधिक आहे. तसेच कर्करोगबाधित रुग्णांच्या आत्महत्यादेखील महाराष्ट्रात सर्वाधिक होत असल्याचे आढळले आहे. मात्र अद्यापही राज्यामध्ये कर्करोगांच्या रुग्णांची नोंदणी बंधनकारक करण्यास राज्य सरकारने ठोस पावले उचलेली नाहीत. परिणामी महाराष्ट्रातील कर्करोगाची स्थिती, प्रमाण, प्रसार आणि व्याप्ती याबाबत पुरेशी माहिती समोर आलेली नाही.

देशभरात कर्करोगाचे प्रमाण हे राष्ट्रीय कर्करोग नोंदणी (नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री) कार्यक्रमानुसार मोजले जाते. आयसीएमआरच्या बंगळुरूस्थित नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स अ‍ॅण्ड रिसर्च संस्थेमार्फत हा कार्यक्रम दोन पातळयांवर चालवला जातो. लोकसंख्या आधारित कर्करोग नोंदणी मध्ये विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील निश्चित लोकसंख्येमध्ये आढळणाऱ्या कर्करोगबाधित नवीन रुग्णांची नोंद केली जाते. तर रुग्णालय आधारित कर्करोग नोंदणी मध्ये विशिष्ट रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कर्करोग रुग्णांची माहिती नोंदवली जाते, ज्यामध्ये प्रामुख्याने



वैद्यकीय सेवा, उपचार आणि परिणामावर लक्ष केंद्रित केले जाते. १९८२ मध्ये ही नोंदणी सुरू झाली असून सुरुवातीला बंगळुरू, चेन्नई आणि मुंबई येथे लोकसंख्या आधारित तर चंदीगढ, तिरुवनंतपुरम आणि आसाममधील दिब्रुगढ येथे रुग्णालय आधारित नोंदणी केली जात होती. या कार्यक्रमाचा कालांतराने विस्तार होत सध्या लोकसंख्याआधारित नोंदणीमध्ये देशभरातील ३८ ठिकाणाहून रुग्णांची नोंदणी केली जाते. रुग्णालय आधारित नोंदणीमध्ये देशभरातील २७३ रुग्णालये जोडलेली आहेत.

एनसीआरपी स्थापन करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे कर्करोगाची व्याप्ती समजून घेण्यासाठी कर्करोगबाधित रुग्ण आणि मृत्यूची आकडेवारी, कर्करोगाच्या विविध प्रकारांचे प्रमाण आणि त्यांची स्थिती, या प्रकारांचा भौगोलिकदृष्ट्या आणि आजाराच्यादृष्टीने झालेला प्रसार याची शास्त्रोक्त पद्धतीने माहिती संकलित करणे. या माहितीचा उपयोग कर्करोग नियंत्रणासाठीच्या धोरणांची दिशा ठरविण्याकरिता केला जातो. तसेच या धोरणांची आणि उपचारात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यासाठीदेखील ही माहिती उपयुक्त ठरते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये कर्करोगाचे व्यवस्थापन सुधारण्यात आणि रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यात एनसीआरपीद्वारे प्राप्त माहितीचा सहभाग महत्त्वाचा आहे. तसेच या माहितीच्या आधारे अनेक संशोधनात्मक अभ्यासही केले गेले आहेत. एनसीआरपीच्या २०२० च्या अहवालामध्ये २०१२ ते २०१६ काळात नोंद झालेल्या देशातील कर्करोगाच्या आजाराची स्थिती जाहीर करण्यात आली. या अहवालानुसार, २०२० मध्ये कॅन्सरचे प्रमाण १.३९ दशलक्ष असून २०२५ पर्यंत ते १.५७ दशलक्षापर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

## राशि भविष्य

**मेष:** तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. या राशीतील काही लोकांना आज जमिनीने जोडलेल्या काही मुद्यांना घेऊन धन खर्च करावे लागू शकते. कुटुंबियांच्या गरजांना प्राथमिकता द्या. त्यांच्याबरोबर आनंदी आणि दु:खी प्रसंगात सामील व्हा, तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना कळू शकेल.

**वृषभ:** तुमच्या चिडण्यामुळे तुम्ही राईचा पर्वत कराल - त्यामुळे तुमच्या कुटुंबातील सदस्य अस्वस्थ होतील. बुद्धिमत्तेच्या जोरावर आपला राग नियंत्रणात ठेवणारे भाग्यवान आत्मे असतात. तुम्ही तुमच्या राग जाळून टाका नाहीतर राग तुम्हाला जाळून भस्मसात करेल.

**मिथुन:** तेलकट आणि तिखट आहार टाळा. आज तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. काही लोक केवळ मनापासून स्मितहास्य करत एखाद्याला विरोध करू शकतात.

**कर्क:** कामाच्या ताणामुळे थकवा आणि तणाव आज जाणवेल. ज्या लोकांनी अतीत मध्ये आपली धन गुंतवणूक केली होती आज त्या धनाने लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या बेफिकीर वृत्तीमुळे पालक काळजीत पडतील. नवीन प्रकल्पात हात घालण्याअगोदर तुम्हाला त्यांना विश्वासात घेण्याची गरज आहे.

**सिंह:** थोडयाशा मानसिक ताणातदेखील आरोग्य चांगले राहील. करमणूक आणि कॉस्मेटिक सुधारणांवर प्रमाणाच्या बाहेर खर्च करू नका. दूरवर राहणारे नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधतील. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा.

**कन्या:** पटकन रागावणे तुम्हाला एखाद्या अडचणीत टाकू शकते. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील. तुम्हाला गरज भासलीच तर मित्र मदतीला धावून येतील. भावनिक अडथळे अडचणी निर्माण करू शकतात. मार्केटिंग क्षेत्रात येण्याची आपली दीर्घकाळ असणारी महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊ शकेल.

**तूळ:** पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या. घरातील गरजेचे सामान खरेदी केल्याने तुम्हाला आर्थिक चिंता नक्कीच होईल परंतु, यामुळे तुम्ही भविष्यातील बऱ्याच समस्यांनी सुटाल. घरातील दुरुस्तीची कामे अथवा सामाजिक भेटीगाठी तुम्हाला व्यस्त ठेवतील.

**वृश्चिक:** विश्रांती, विरंगुळ्यासाठी तुमच्या प्रिय मित्रमंडळींसमवेत वेळ घालवा. तुमच्या द्वारे धन वाचवण्याचे प्रयत्न आज अयशस्वी होऊ शकतात तथापि, तुम्हाला यापासून घाबरण्याची आवश्यकता नाही स्थिती लवकरच सुधारेल. मुलांवर आपली मते लादण्यामुळे ती त्रस्त होतील.

**धनु:** आपल्या मुलांच्या कामाचा तुम्हाला अपरिमित आनंद होईल. जे लोक लघु उद्योग करतात त्यांना आजच्या दिवशी आपल्या कुठल्या ही जवळच्या लोकांचा सल्ला मिळू शकतो. ज्यामुळे आर्थिक लाभ ही मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या जंगी पार्टीत आज सर्वांना सामावून घ्या.

**मकर:** तुमचा सकारात्मक दृष्टिकोन तुमच्या अवतीभवती असलेल्या लोकांना प्रभावित करील. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे. नातेवाईक/मित्रमंडळी अचानक संध्याकाळी तुमच्या घरी अवतरतील आणि धमाल उडवून देतील.

**कुंभ:** कलात्मक छंद तुम्हाला आराम मिळवून देतील. आर्थिक दृष्ट्या आज दिवस मिळता-जुळता राहील. आज तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो परंतु, यासाठी तुम्हाला कठीण मेहनत करावी लागेल. अनपेक्षित जबाबदारी आल्यामुळे तुमचे दिवसभराचे बेत रखडतील - तुम्ही दुस-यांसाठी बरेच काही कराल आणि स्वत:साठी काहीच करत नाही असे आढळेल.

**मीन:** तुमच्या सर्व अडचणी, समस्यांवर हसत हसत मात करणे हाच उत्तम उपाय ठरतो. आज तुम्ही धन संबंधाने जोडलेल्या समस्यांच्या कारणाने चिंतीत राहू शकतात यासाठी तुम्हाला आपल्या कुठल्या विश्वासपात्रचा सल्ला घेतला पाहिजे. मित्र आणि नातेवाईक मदत करतील, त्यांच्या सहवासात तुम्ही बरेच आनंदी रहाल.

# रस्त्यांवर वाहन फिरवून महापालिकेची तिजोरी 'साफ

**पिंपरी :** शहरातील १८ मीटरपेक्षा जास्त रुंदी असलेल्या रस्त्यांची सफाई यांत्रिकी पद्धतीने करणाऱ्या ठेकेदाराने किलोमीटर वाढवण्यासाठी रस्ता साफ न करताच रस्ते सफाई वाहन (रोड स्वीपर) पळवल्याचे समोर आले आहे. आरोग्य विभागाने लायन सर्व्हिसेस या ठेकेदार कंपनीला ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.



महापालिकेमार्फत शहरातील १८ मीटर रुंदीचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने साफ केले जातात. शहराचे दक्षिण आणि उत्तर असे दोन भाग केले आहेत. फेब्रुवारीपासून यांत्रिकी पद्धतीने चार विभागांत काम सुरू असून त्यासाठी चार संस्था कार्यरत आहेत. प्रत्येक विभागात दोन मोठी, दोन मध्यम रस्ते सफाई वाहने, दोन हायवा, एक पाण्याचा टँकर अशा वाहनांचा समावेश आहे.

या वाहनांचे संचलन करण्यासाठी प्रत्येक विभागात ३२ सफाई कर्मचारी, नऊ वाहनचालक, दहा ऑपरेटर, चार मदतनीस अशा ५५ कामगारांद्वारे कामकाज करणे अपेक्षित आहे. प्रत्येक रस्ते सफाई वाहनाद्वारे दररोज ४० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची साफसफाई करणे आवश्यक आहे. १८ मीटर व त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्ते, बीआरटीएस, महामार्गावरील पदपथ आणि सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूंची आठवड्यातून तीन वेळा, मुख्य मार्गावरील मधल्या रस्त्याची, रस्त्याच्या कडेच्या भिंतीच्या परिसराची आठवड्यातून एका वेळा साफसफाई करणे आवश्यक आहे.

पुणे-मुंबई रस्त्यावरील दापोडी ते पिंपरी रस्त्याच्या स्वच्छतेची जबाबदारी लायन सर्व्हिसेस लि. या कंपनीकडे आहे. आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दापोडी ते पिंपरी या रस्त्यावरील कामकाजाची पाहणी केली. रस्तेसफाई करणारे वाहन रस्ता साफ न करताच पळवले जात होते. याप्रकरणी संबंधित ठेकेदार कंपनीला आरोग्य विभागाने नोटीस पाठवून खुलासा मागविला. मात्र, संबंधित ठेकेदार कंपनीने समाधानकारक खुलासा केला नाही. त्यामुळे ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम ठेकेदाराच्या बिलातून वसूल केली जाणार आहे. तसेच यापुढे कामात हलगर्जीपणा आढळल्यास सक्त कारवाईचा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे.

# बोरिवली-विरार वाहतूक विस्ताराचा मार्ग मोकळा



**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील बोरिवली-विरार स्थानकांदरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या बांधकामामुळे लोकल सेवेवरील मर्यादा दूर होऊन इंधनाची बचत होईल व कार्बन उत्सर्जनात घट होईल, असे सांगत उच्च न्यायालयाने मार्गिकेच्या आड येणारी २,६१२ खारफुटी तोडण्यास परवानगी दिली. या निर्णयामुळे या मार्गिका विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सार्वजनिकदृष्ट्या हिताचा आहे आणि त्याचे महत्वपूर्ण पर्यावरणीय फायदे आहेत, असेही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. त्याच वेळी, प्रकल्पामुळे होणारे पर्यावरणीय नुकसान भरून काढण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाला ७,८२३ खारफुटीचे पुनर्रोपण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. खारफुटी तोडण्यास उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. परंतु सार्वजनिक हिताच्या प्रकल्पासाठी खारफुटी तोडायची असल्यास उच्च न्यायालयाच्या परवानगीची अट आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम रेल्वेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिला पोलिसांच्या पालकांच्या डोळ्यात अश्रू, म्हणाले, थँक्यू फडणवीस



**नागपूर:** पोलीस दलात निवड झालेल्या महिला पोलिसांचे नागपूरच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण पूर्ण झाले. त्यांना शुक्रवारी झालेल्या दीक्षांत समारंभात प्रमाणपत्र देण्यात आले. एकूण १२०० महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांना आता काही दिवसांनी कामावर रुजू व्हावे लागणार आहे. पोलीस प्रशिक्षण केंद्रात आयोजित दीक्षांत समारंभात प्रशिक्षणार्थी महिला पोलिसांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक दुर्गम भागातील होते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आले होते. सर्वांना आपल्या मुलीला पोलीस पोशाखात रुबाबात परेड करताना बघायचे होते. ते बघून त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. आपण केलेल्या कष्टाचे उत्तम फळ आले याचा त्यांना अभिमान होता. या सोबतच राज्याच्या गृहमंत्र्यांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. 'थँक्यू फडणवीस'अशी त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. पोलीस प्रशिक्षण केंद्र नागपूर येथे पोलीस प्रशिक्षणार्थी सत्र क्रमांक ११२ चे दीक्षांत संचालन सकाळी ८ वाजता पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या मैदानावर पार पडले. विशेष पोलीस महानिरीक्षक ( प्रशिक्षण व खास पथके) प्रवीणकुमार पडवळ उपस्थित होते. त्यांनी परेड निरीक्षण केले. यावेळी प्रशिक्षणार्थींनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रशिक्षणार्थींचे पालक, आप्त स्वकीय उपस्थित होते. परडे संचलन झाल्यावर सर्व पालकांनी त्यांच्या प्रशिक्षणार्थी मुलींची भेट घेतली. तेव्हा त्यांच्या डोळ्यात अश्रू आले होते. आलेल्या पालकांमध्ये बहुतांश मध्यमवर्गीय, गरीब , दुर्गम भागातील होते. त्यांनी पोटाला चिमटा घालून मुलींना शिकवले होते. मुलींनीही त्यांच्या कष्टाचे चिज केले. त्यांची पोलीस दलात निवड झाली. त्यांना पोशाखात पाहिल्याव र पालकांना समाधान झाले. चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातून अत्यंत छोटशा गावातून आलेले सूर्यवंशी म्हणाले.

# परळमधील टाईम्स टॉवरला भीषण आग

**मुंबई :** परळ येथील सेनापती बापट मार्गावरील कमला मिल कंपाऊंडजीकच्या टाईम्स टॉवरला शुक्रवारी सकाळी साडे सहाच्या सुमारास अचानक आग लागली. अग्निशमन दलाचे जवान आग विझविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असून सुदैवाने आगीत कोणीही जखमी झाल्याची नोंद नाही.





चौदा मजली टाईम्स टॉवरच्या विद्युत यंत्रणेत बिघाड झाल्याने ही आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. इमारतीच्या तिसऱ्या ते सातव्या मजल्यांदरम्यान आग पसरली. विद्युत तारांच्या संपर्कात आलेल्या आगीमुळे मोठा आगडोंब उसळला. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, पोलीस, बेस्ट उपक्रम व संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि मदतकार्य हाती घेतले.

दुसऱ्या मजल्यावरील दरवाजाला कुलुप असल्याने अग्निशामकांनी हातोड्याने ते तोडून आत प्रवेश केला. तसेच, कोणी अडकले नसल्याची खात्री करून आग विझविण्याचे काम सुरू केले. आगीची वाढती तीव्रता लक्षात घेऊन सकाळी ६ वाजून ३६ मिनिटांनी क्रमांक एकची वर्दी, तर ६ वाजून ४७ मिनिटांनी क्रमांक दोनची वर्दी देण्यात आली. तसेच, अग्निशमन दलातर्फे विविध अद्ययावत यंत्रांच्या साहाय्याने आग विझविण्याचे काम अद्यापही सुरू आहे.

## Former wrestler of India resigns from Indian Railways

**India -** India wrestler Vinesh Phogat resigned on Friday - September 6, 2024 from the Indian Railways. She cited personal reasons amid speculations that she would be joining the Congress party. She was employed as an Officer on Special Duty (OSD) with Northern Railways."Serving Indian Railways has been a memorable and proud time of my life," she posted on X with a picture of her resignation letter. "At this point in my life, I have decided to separate myself from the railway service and have submitted my resignation to the competent authorities of the Indian Railways."I will always be grateful to the Indian Railway family for this opportunity given to me by the Railways in the service of the nation," she added. Following her disqualification from the 50kg gold medal match in the Paris Olympics the 30-year-old wrestler had quit wrestling. She had appealed against the decision which was rejected by Court of Arbitration for Sport.

## Club and lounge manager, woman accused of cheating, extortion

**MUMBAI -** The Bangur Nagar police has filed charges against a woman and the manager of an Andheri-based club and lounge for allegedly duping a man through a dating app. The accused woman reportedly targeted unsuspecting victims on the app, then lured them to the expensive club where they were hit with exorbitant and inflated bills.



The fraudulent proceeds were allegedly shared with the club's owner. On Wednesday, the police booked the woman and the club manager on charges of extortion.

The 26-year-old complainant, an LIC agent residing in Goregaon (West), reported the incident after being deceived on July 30. He had interacted with a profile named 'Muskaan' on a dating app, and they exchanged mobile numbers. Muskaan persuaded him to meet on August 4, leading him to a pizza outlet on Veera Desai Road in Andheri (West). From there, Muskaan directed him to 'The Godfather' pub, where she ordered five 60-ml pegs of JW Blue Label whiskey, along with other drinks and a pizza. The complainant became suspicious about the authenticity of the liquor. Throughout their time at the pub, Muskaan received frequent phone calls and was often engaged in lengthy conversations.

## ठाण्यातील महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांचा मार्ग मोकळा

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील ५० किमीहून अधिक लांबीच्या आणि साडेबारा हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रस्ते प्रकल्पांच्या बांधकामाचा मार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मोकळा केला आहे.पूर्वमुक्त मार्ग विस्तारीकरण, ठाणे खाडी किनारा मार्ग यासह अन्य प्रकल्पांच्या बांधकामाच्या निविदा एमएमआरडीएच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत अंतिम करण्यात आल्या आहेत. अशोका बिल्डकॉन, नवयुग, जे कुमार, अँफकॉन्स आदी कंपन्यांना प्रकल्पांच्या कामाचे कंत्राट देण्यात आले आहे. आता लवकरच पुढील कार्यवाही करून डिसेंबरखेर वा नव्या वर्षाच्या सुरुवातीस ५० किमी लांबीच्या रस्ते प्रकल्पांच्या कामास सुरुवात होण्याची शक्यता आहे.




मुंबई आणि ठाण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रवास अतिवेगवान करण्यासाठी एमएमआरडीएने विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. मागील काही वर्षांपासून मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात एमएमआरडीएने विविध प्रकल्प, कामांचा सपाटा लावला आहे. ठाण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी साडेबारा हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाचे प्रकल्प एमएमआरडीएने राबविण्याचा निर्णय घेतला असून आता लवकरच हे प्रकल्प प्रत्यक्षात मार्गी लागणार आहेत.

# वाहतूक पोलिसांना ठोस उपाय मिळेना, नियोजनशुन्य कारभारामुळे प्रवास नकोसा

**ठाणे :** नवे ठाणे अशी ओळख असलेल्या घोडबंदर भागासह ठाणे शहरातील वाहतूक व्यवस्थेचे गेल्या एक ते दोन वर्षांपासून तीनतेरा वाजल्याने नागरिक मेटाकुटीला आले आहेत. ठाणे वाहतूक शाखेचे तत्कालीन पोलिस उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांना कोंडी सोडविण्यासाठी ठोस उपाय सापडलेला नसल्यामुळे कोंडीची समस्या कायम असून नवे उपायुक्त पंकज शिरसाट यांचे स्वागतही घोडबंदर भागात दोन दिवसांपासून होणाऱ्या कोंडीने झाले आहे. घोडबंदर मार्गावर वाहन उलटून झालेल्या कोंडीनंतरही अवेळी होणारी अवजड वाहतूक बंद करण्याऐवजी ती सुरुच ठेवण्यात येत असल्याने कोंडी भर पडत असून या नियोजन शुन्य कारभारामुळे नागरिकांना प्रवास नकोसा वाटू लागला आहे.



देशाची आर्थिक राजधान असलेल्या मुंबईलगत ठाणे शहर येते. तसेच मुंबई महानगरातील महत्वाचे शहर म्हणून ठाणे ओळखले जाते. उरण येथील जेएनपीटी बंदरातून गुजरातच्या दिशेने अवजड वाहतूक सुरू असते. ही वाहतूक ठाणे शहर आणि घोडबंदर भागातून होते. शहराचे मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाल्याने वाहन संख्येत वाढ झाली आहे. शहरात मेट्रो, रस्ते रुंदीकरण तसेच विविध प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामामुळे आधीच रस्ते अरुंद झाले आहेत. यामुळे ठाणे आणि घोडबंदर भागातील रस्त्यांवर कोंडी होत आहे. त्यात एखादे अवजड वाहन बंद पडले किंवा अपघात झाला तर मार्गावरील वाहतूकीचे तीनतेरा वाजतात. अंतर्गत मार्गही कोंडले जातात. त्याचा फटका या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नोकरदार वर्गाला बसतो. गेल्या एक ते दोन वर्षांपासून हे चित्र सातत्याने दिसून येत आहे. ठाणे वाहतूक शाखेचे तत्कालीन पोलिस उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड आणि ठाणे महापालिका प्रशासनाने काही वाहतूक बदलाचे प्रयोग केले.

### नियोजनशुन्य कारभार

सकाळ आणि सायंकाळच्या वेळेत नोकरदार वर्गाची वाहने ठाणे आणि घोडबंदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात येतात. यावेळेत वाहतूकीस अडथळा नको म्हणून अवजड वाहनांना वाहतूकीसाठी वेळा ठरवून देण्यात आलेल्या आहेत. रात्री ११ ते पहाटे ५ तर, दुपारी १२ ते ४ यावेळेत अवजड वाहतूकीला परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु अवेळी अवजड वाहतूक सुर असल्याने कोंडी होते. घोडबंदर मार्गावर वाहन उलटून अपघात झाल्यानंतर वाहतूक ठप्प होते. या काळात अवजड वाहतूक शहराबाहेरच रोखून धरणे आवश्यक आहे. पण तसे नियोजन होताना दिसून येत नाही. या उलट अवजड वाहतूक सुरुच ठेवल्याने कोंडीत भर पडते. माजिवाडा येथून कोलशेत भागात जाणारा मार्गाचे रुंदीकरण करण्यात आलेले आहे. घोडबंदर मार्गावर कोंडी झाल्यानंतर वाहने माजिवाडा-कोलशेत मार्गे वाहतूक करीत असल्याने तिथेही कोंडी होते. त्याचा फटका नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांना बसतो. ठोस नियोजन होत नसल्यामुळेच कोंडी कायम असल्याचे चित्र आहे.

## Even as Navy, IAF helicopters deliver aid to rooftops, Andhra and Telangana brace for more heavy rain



**Telangana -** As parts of Andhra Pradesh and Telangana reel from floods that have left several dead and many more stranded, the India Meteorological Department has warned that the two states are likely to get more heavy rain in the next five days.

Relief operations continued on Wednesday with the Navy and Air Force helicopters, in a joint operation, delivering 58,000 kg of food, water and medical aid to the rooftops of stranded households. From September 4 to September 9, heavy to very heavy rains are likely to occur in Komaram Bheem Asifabad, Mancherial, Jayashankar Bhupalpally, Mulugu, Bhadradri Kothagudem, Adilabad, Nirmal, Nizamabad, Jagityal, Rajanna Sirsilla, Peddapalli, Khammam, Suryapet, Mahabubabad, Warangal, and Hanamkonda districts of Telangana. Thunderstorms accompanied by gusty winds (30-40 kmph) are also very likely to occur at isolated places in all Telangana districts. In Andhra Pradesh, north and south coastal districts and the Rayalaseema region are likely to get heavy to very heavy rainfall in the next five days. The rainfall is likely to cause more flooding in the Budameru Rivulet, flowing through Vijayawada city, which is already reeling with several of its areas under water since Sunday.

## बिबट्याच्या हल्ल्यात मुलाचा मृत्यू

● नाशिक, (प्रतिनिधी) :

सिन्नर तालुक्यातील बेंदमळा भागात गुरुवारी रात्री बिबट्याच्या हल्ल्यात नऊ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. घराच्या ओट्यावर तो गेला असता पाठ वळताच बिबट्याने झडप घालून त्याला शेतात खेचून नेले. प्रफुल्ल तांबे असे या मुलाचे नाव आहे. समृद्धी महामार्गालगतच्या गोंदे येथील बेंदमळा भागातील तांबे वस्तीत ही घटना घडली. रात्री नऊच्या सुमारास प्रफुल्ल हा वडिलांबरोबर लघुशंकेसाठी घराबाहेर आला होता. त्यानंतर घरात जात असताना बिबट्याने त्याला ओट्यावरून क्षणार्धात उचलून मक्याच्या शेतात नेले. वडील रवींद्र तांबे यांनी आरडाओरड केली. घरातील लोक बाहेर आले. वस्तीवरील नागरिकांनी धाव घेतली. सर्वांनी लाठ्या-काठ्या घेऊन शोध घेतला. एका ठिकाणी प्रफुल्ल गंभीर जखमी अवस्थेत आढळला. त्याला तातडीने सिन्नर येथे नेण्यात आले. परंतु, त्याचा आधीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

या घटनेनंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी रात्रभर बिबट्याचा शोध घेतला. परंतु, तो मिळून आला नाही. काही दिवसांपूर्वी तांबे कुटुंबियांच्या कुत्र्याचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला होता.

# अजित पवारांसोबतच्या युतीबद्दल फडणविसांनी केलेल्या वक्तव्यातून उडाली खळबळ

● मुंबई, (प्रतिनिधी) :

अजित पवार यांच्यासोबतची आमची युती नैसर्गिक नाही, असे वक्तव्य करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कबुली दिली आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची युती नैसर्गिक नसल्याची टीका करणाऱ्या भाजपची गोची करणारे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. त्यांनी महायुतीबद्दल टिप्पणी केली आहे. अजित पवार यांच्यासोबत असलेली आमची युती नैसर्गिक नाही म्हणूनच अजितदादांना आमचा गुण लागण्यासाठी वेळ लागेल, असं त्यांनी म्हटलं आहे.

एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी हे विधान केलं आहे. अजित पवार यांनी अलीकडेच आपल्या राजकीय भूमिकेविषयी वक्तव्य केलं होतं. महायुतीत असलो तरी धर्मनिरपेक्षतेशी तडजोड करणार नाही, असं त्यांनी म्हटलं होतं. त्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्याला महत्त्व आहे.



लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या झालेल्या दारुण पराभवानंतर अजित पवार यांच्याशी झालेल्या युतीकडे बोट दाखवले गेले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही आपल्या मुखपत्रातून नाराजी व्यक्त केली होती. ती चूक होती का असं फडणवीसांना विचारलं असता त्यांनी नकारात्मक मत स्पष्ट करत 'नाही' असं उत्तर दिलं. ती त्या वेळेची गरज होती. आलेली संधी कधी सोडायची नसते. सगळं काही स्थिरस्थावर व्हायला थोडा वेळ लागेल. त्यांना आमचा गुण लागेल. त्यामुळं दोघांचाही फायदा होईल, असं फडणवीस म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या मतांचं विश्लेषणही त्यांनी केलं. 'महायुती आणि महाविकास आघाडीच्या मतांमध्ये केवळ तीन टक्क्यांचा फरक आहे. त्यातून विजयी जागांचा आकडा बदलला. भाजपची मतं जितक्या सहजपणे शिवसेनेला मिळाली आणि शिवसेनेची मतं जितक्या नैसर्गिकरित्या आमच्याकडे आली, तसं अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या मतांचं झालं नाही. आमचीही मतं त्यांना पूर्ण मिळाली असं म्हणता येणार नाही. त्यासाठी थोडा वेळ लागेल. येत्या विधानसभा निवडणुकीत मतं एकमेकांकडे ट्रान्सफर होतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

## मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूल दुभंगला

● गोंदिया, (प्रतिनिधी) :



दोन महिन्यापूर्वीच वाहतुकीसाठी सुरू करण्यात आलेल्या मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूलाला मोठ-मोठ्या भेगा पडल्याचा प्रकार आज गुरुवार, ५ सप्टेंबर रोजी उघडकीस आला असून हा पुलच दुभंगल्याचे चित्र आहे. परिणामी पुलावरून आता एकेरी वाहतूक करण्याची नामुष्की राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर आली आहे. पुलाचे बांधकाम करणाऱ्या कंपनीच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर चार वर्षांपूर्वी नागपूर ते देवरी दरम्यान मौदा, मोहघाटा, नैनपूर, मासूलकसा घाट व शिरपूर या पाच ठिकाणी जंगल परिसरात वन्यप्राण्यांच्या आवागमनासाठी भुयारी मार्गाला मंजूरी देण्यात आली. यानुसार गोंदिया जिल्ह्यातील कोहमारा ते देवरी पर्यंत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा जंगल परिसर असल्याने नैनपूर व मासूलकसा घाट परिसरात वन्यप्राण्यांना आवागमन करण्याकरिता सोईस्कर व्हावे यासाठी उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. यात नैनपुर जवळील एक पूल वाहतुकीसाठी दोन महिन्यापूर्वी सुरू करण्यात आला होता. मात्र, दोन महिन्यांतच या उड्डाणपुलावर मोठ-मोठ्या भेगा पडल्याने पुल बंद करण्याची वेळ संबंधित कंपनी व महामार्ग प्राधिकरण प्रशासनावर आली आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीला पुलावरून वाहतूक सुरू होताच आठवडाभरात या पुलावर मोठे भगदाड पडले होते. त्यावेळीही या पुलावरून वाहतूक बंद करण्यात आली होती. दरम्यान, दुरुस्ती केल्यानंतर दोन महिन्यापूर्वी या पुलावरून पुन्हा वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र, यावेळी पुलावर मोठ मोठ्या भेगा पडल्याने हा उड्डाणपूल दुभंगल्याचे दिसून येत आहे. या मुळे बांधकाम कंत्राटदार कंपनी व संबधिताकडून पुन्हा एकदा हा पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे एकेरी मार्गाने वाहतूक सुरू आहे. तर दोन महिन्यातच पुलावर भेगा पडल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर गोंदिया जिल्ह्यातील नैनपूर व मासूलकसा घाट परिसरात उड्डाणपुलाचे बांधकाम करण्यात येत असून या बांधकामाचे कंत्राट अग्रवाल ग्लोबल इन्फ्राटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला देण्यात आले आहे.

## नरेश म्हस्के यांच्या खासदारकीला आव्हानाचे प्रकरण

### मतदान यंत्र परत मिळविण्यासाठी निवडणूक आयोग उच्च न्यायालयात

● मुंबई, (प्रतिनिधी) :

ठाणे लोकसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांच्या निवडणुकीला उद्धव ठाकरे गटाचे नेते राजन विचारे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या वादामुळे कायदेशीर कचाट्यात अडकलेले मतदान यंत्र (ईव्हीएम) परत मिळण्याच्या मागणीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानेही उच्च न्यायालयात याचिका केली आहे.



विचारे यांच्या याचिकेमुळे अनेक मतदान यंत्रे जिल्हा निवडणूक कार्यालयात अडकून पडली आहेत. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, ही यंत्र मिळणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद निवडणूक आयोगाच्या वतीने वकील अभिजीत कुलकर्णी यांनी न्यायालयात केला. त्यावर या प्रकरणात पुरावा म्हणून मतदान यंत्राची गरज होती का ? असा प्रश्न न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या एकलपीठाने उपस्थित केला. त्यावर, मतमोजणीचा निकाल आधीच निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यामुळे, या मतदान यंत्राची आवश्यकता नाही. तसेच, याचिकेसह जोडलेली कागदपत्रे आणि पुराव्यांवर याचिका आधारित असल्याचे विचारे यांच्या वतीने युक्तिवाद करताना वरिष्ठ वकील दरायस खंबाटा यांनी न्यायालयाला सांगितले.

## ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामविरोधात धडक कारवाई

● नवी मुंबई, (प्रतिनिधी) :

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सागरनाथ रामा मढवी, घर नं - 30 ,मच्छी मार्केटच्या मागे, दिवा गाव ,सेक्टर – 9 , ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.1591/2023 च्या आदेशानुसार आज रोजी 1 ल्या मजल्याचे बांधकाम अंशत: निष्कासीत करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी पोकलेन, जेसीबी सारखी मशनरी जावु शकत नसल्याने या मोहिमेसाठी 2 गॅस कटर, 4 हॅमर, 2 ब्रेकर व 20 मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## गोदावरी खोऱ्यातील नेत्यांचा नार-पारचे पाणी पळविण्याचा प्रयत्न – गिरणा धरणावरील मेळाव्यात आरोप

● मालेगाव, (प्रतिनिधी) :



अती तुटीच्या गिरणा खोऱ्याची तहान भागविण्यासाठी नार,पार या नद्यांचे किमान ३० टीएमसी पाणी वळविण्यासाठी सातत्याने मागणी होत आहे. मात्र गोदावरी खोऱ्यातील पुढारी दांडगाई करुन हे पाणी पळविण्याचा प्रयत्न करीत असताना खान्देशमधील मंत्रीगण बघ्याची भूमिका घेत असल्याची टीका गिरणा धरणावर आयोजित मेळाव्यात करण्यात आली. नार,पार या नद्यांचे हक्काचे पाणी मिळविण्यासाठी आता आर-पारची लढाई लढण्याचा निर्धारही याप्रसंगी करण्यात आला. गिरणा खोरे बचाव कृती समितीच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार उन्मेश पाटील हे अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी जलपूजन करण्यात आले. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला नुकतीच मंजुरी देण्यात आली. परंतु, या योजनेत केवळ ९.५ टीएमसी पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे. अत्यल्प पाण्यावर होणारी संभाव्य बोळवण तसेच नार-पार खोऱ्यात उपलब्ध असणारे उर्वरित पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची निर्माण झालेली शक्यता यामुळे गिरणा खोऱ्यातील जनतेत असंतोष पसरल्याचे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर हा मेळावा घेण्यात आला.

पाण्याच्या बाबतीत अती तुटीचे खोरे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिरणा खोऱ्यावर सत्ताधाऱ्यांकडून सातत्याने अन्याय होत असल्याची भावना यावेळी विविध वक्त्यांनी मांडली. गोदावरी खोरे तुलनेने समृद्ध असताना गिरणा खोऱ्यातील हक्काच्या पाण्यावर तेथील पुढाऱ्यांचा डोळा असल्याबद्दलही याप्रसंगी आक्षेप नोंदविण्यात आला. गिरणा खोऱ्यावरील अन्याय दूर करण्यासाठी तसेच किमान ३० टीएमसी पाणी मिळविण्यासाठी पक्षविरहित लढा उभारण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

## केडीएमसी आयुक्तांनी केली दुर्गाडी गणेश घाट परिसराची पाहणी



● कल्याण, (प्रतिनिधी) :

कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी गणेश घाट येथे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील तसेच उल्हासनगर येथील मोठ्या श्रीगणेश मूर्ती प्रामुख्याने विसर्जनासाठी येत असतात. कल्याण मधील हे सर्वात मोठं नैसर्गिक विसर्जन स्थळ असल्यामुळे तेथे करण्यात आलेल्या तयारीची आज महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी पाहणी केली. या पाहणी दौ-यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, कार्यकारी अभियंता जगदिश कोरे, विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव उपस्थित होते. या ठिकाणी असलेल्या दुर्गामाता चौकातून दुर्गाडी गणेश घाटाकडे जाण्यासाठी यापूर्वी दोन रस्ते होते. यातील एक रस्ता जाण्यासाठी व दुसरा रस्ता बाहेर येण्यासाठी वापरला जात होता. परंतू यातील एक मार्ग चालू वर्षी या ठिकाणी स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत तयार करण्यात येत असलेल्या नेव्हल म्युझीयममुळे कायमस्वरुपी बंद झाला होता. त्यामुळे विसर्जनासाठी येणा-या वाहनांना पर्यायी मार्गाची मागणी पोलीस विभाग तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत होती. याकरीता या ठिकाणी रिंग रोडवर असलेल्या सीएनजी पेट्रोल पंपा पासून दुर्गाडी गणेश घाटापर्यंत पर्यायी रस्ता तयार करण्याचा निर्णय महापालिकेमार्फत घेण्यात आला.

# गोराई, चारकोप, मालवणीतील जागतिक बँक प्रकल्पातील रहिवाशांना दिलासा

● मुंबई , (प्रतिनिधी) :

जागतिक बँक प्रकल्पातील गोराई, चारकोप आणि मालवणीतील अत्यल्प व अल्प गटातील रहिवाशांना अखेर अतिरिक्त चटईक्षेत्रफळ मोफत उपलब्ध होणार आहे. याबाबतचा निर्णय वर्षभरापूर्वी तत्कालीन म्हाडा उपाध्यक्षांनी घेतला होता. मात्र त्याची आता अंमलबजावणी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे निवासयोग्य प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक बांधकामांना अतिरिक्त चटईक्षेत्रफळापोटी अधिमूल्य भरण्यापासून दिलासा मिळाला आहे. गोराई तीन, चारकोप- कांदिवली येथील सेक्टर क्रमांक आठ व नऊ आणि मालवणी-मालाड येथील जागतिक बँक प्रकल्पांतर्गत ज्या प्रकल्पधारकांना वा सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्टा करताना दीड इतके चटईक्षेत्रफळ लागू झाले आहे त्यांनाच हा लाभ मिळणार आहे. उर्वरित जागतिक बँक प्रकल्पधारकांना मात्र हा लाभ लागू होणार नाही, असे म्हाडा अधिकाऱ्याने स्पष्ट केले. या रहिवाशांना करारनामा करताना दीड इतके चटईक्षेत्रफळ लागू करण्यात आले होते. पॉईंट ८५ मोफत तर पॉईंट ६५ अधिमूल्य भरून उपलब्ध करून देण्यात आले होते. या रहिवाशांनी तळमजल्याचे बांधकाम करून पॉईंट ८५ चटईक्षेत्रफळ वापरले होते. त्यावर पॉइंट ६५ चटईक्षेत्रफळाइतका मजला चढविला होता. तो अधिमूल्य न आकारता नियमित करावा अशी मागणी करण्यात आली होती. ती मान्य करण्यात आली आहे.

१९८५ ते १९९५ या काळात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मुंबई नागरी विकास प्रकल्प राबविण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने अत्यल्प आणि अल्प गटातील संकुल भूखंडाचे वितरण करण्यात आले. या संकुल भूखंडामध्ये २१, २५, ३० आणि ४० चौरस मीटर इतक्या आकाराच्या भूखंडांचा समावेश होता. १९८७ मधील शासन निर्णयानुसार अत्यल्प व अल्प गटातील या भूखंडांना पॉईंट ८५ इतके चटईक्षेत्रफळ लागू होते. मात्र गोराई तीन, चारकोप सेक्टर आठ व नऊ आणि मालवणी मालाड येथील अभिन्यास १.२ चटईक्षेत्रफळानुसार मंजूर झाले असून त्यामधील संकुल भूखंडांना दीड इतके चटईक्षेत्रफळ लागू करण्यात आले.

त्यानुसार दीड चटईक्षेत्रफळाचा वापर करून बांधकाम केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना पॉईंट ६५ चटईक्षेत्रफळाकरीता अधिमूल्य आकारण्याबाबत देकार पत्र देण्यात आले होते. मात्र ते लागू होत नाही, असे संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे म्हणणे होते. याबाबत म्हाडाचे तत्कालीन उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर यांच्याकडे सादरीकरण करण्यात आले होते.



# पुणे- मुंबई महामार्गावर वाहतूक कोंडी

### अमृतांजन पुलाजवळ वाहतूक कासवगतीने



● पुणे, (प्रतिनिधी) :

मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी झाली आहे. मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या लेनवर वाहतूक संथ गतीने सुरू आहे. अनेक चाकरमानी हे गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपापल्या गावी निघाले आहेत. पण, त्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. महामार्गावर वाहनांची संख्या वाढल्याने वाहतूक कोंडी झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर मुंबहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या लेनवर वाहतूक कोंडी झाली आहे. वाहतूक कासवगतीने सुरू आहे. उद्या गणपती बाप्पाचं आगमन होणार असल्याने अनेक चाकरमानी हे त्यांच्या मूळ गावी निघण्यास सुरुवात झाली आहे. अनेकांनी मुंबई- कोकण महामार्गावर वाहतूक कोंडी झाल्याने पुणे- मुंबई महामार्गावरून कोकणात जाणे पसंत केले आहे. परिणामी वाहनांची संख्या वाढल्याने द्रुतगती मार्गावर देखील वाहतूक कोंडी झाली आहे. २० मिनिटांचा अवधी घेऊन मुंबहून पुण्याच्या दिशेने जाणारी वाहतूक दोन्ही लेनवरून सोडली जात आहे. तर, पुण्याहून मुंबई च्या दिशेने जाणारी वाहतूक थांबवली जात आहे. पुणे- मुंबई वरील वाहतुकीचा ताण कमी करण्याच्या प्रयत्न महामार्ग पोलिसांकडून केला जात आहे.